# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १५**

**(सभावृत्तांत)**

दिनांक–२८/०६/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार,दिनांक २८/०६/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ठंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
७) मा.कुटे निर्मला संजय
८) मा.कोमल दिपक मेवानी
९) मा.आशा धायगुडे-शेंडगे
१०) मा.गोफणे अनुराधा देविदास
११) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१३) मा.राजू मिसाळ
१४) मा.अमित राजेंद्र गावडे
१५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.गावडे-सहआयुक्त,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.इंदलकर, मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.खोत-सहाय्यक आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.निकम,मा.इंगळे,मा.चव्हाण,मा.घुबे,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे, मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.घोडे,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.गायकवाड,मा.भोसले, मा.मोरे-कार्यकारी अभियंता,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी,मा.बुरसे-मुख्य अभियंता पीएमपीएमएल, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक २०) | मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.४६३ मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.माधुरी कुलकर्णी, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक २१) | पांजरपोळ नविन टाकी ते चक्रपाणी वसाहत मुख्य जलवाहिनी टाकणेबाबत... |
| विषय क्रमांक २२) | प्र.क्र.३० मधील काही स्वच्छतागृहांचे काम मे.बी.एस.एम. एंटरप्रायजेस यांना देणेबाबत – मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव.... |
| विषय क्रमांक २३) | ठ.क्र.१९०८३ मध्ये दुरुस्ती करणेबाबत - मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव.... |
| विषय क्रमांक २४) | मनपाचे विविध विभाग व मा.पदाधिकारी यांना आवश्यक निमंत्रणपत्रिका, लेटरहेड व पाकीटे छपाई करणेबाबत... |

-----------

**निर्णय- १)** पी.जी. पोर्टलवर दाखल झालेल्या तक्रारीसंदर्भातील पुरावे तक्रारदाराने द्यावेत. प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही झालीच पाहिजे. कोणाला पाठिशी घालू नये.

**२)** ३१ मार्च नंतर बील दिले नाही किंवा बील स्विकारले नाही म्हणून तक्रारदार कायदाबाह्य काम करायला सांगत असतील, कायद्याचे उल्लंघन करण्यासाठी दबावतंत्र वापरत असतील तर महापालिकेच्या वतीने संबंधित तक्रारदारावर फौजदारी दाखल करावी.

**३)** स्थायी समितीचे आदेश आहेत की, लांडे साहेब असोत किंवा जे कोणी असतील त्या सगळ्यांवर, ते दोषी आढळले तर त्यांच्यावर शंभर टक्के गुन्हा दाखल झालाच पाहिजे. परंतू जर अशाप्रकारे खोट्या तक्रारी दाखल केल्या जात असतील किंवा एखादा अधिकारी कायद्याचे पालन करत असताना तो कायद्याचे पालन का करतो म्हणून शहरातील एखादा नागरीक त्या अधिका-यावर आरोप करत असेल, यातून महापालिकेची बदनामी होत असेलतर यापुढे महापालिकेने काळजी घेऊन अशा लोकांवर फौजदारी दाखल झाली पाहिजे.

**४)** जो कायदा आहे, नियम आहेत, त्याचे पालन हे महापालिका करणारच आहे. त्याच्याआड जाऊन जर कोणी अशाप्रकारचे आरोप करत असतीलतर ते खपवून घेतले जाणार नाहीत. संबंधीत व्यक्तीस बोलवून घ्यावे. त्याने केलेल्या तक्रारीची शहानिशा करावी. दोषी आढळल्यास शंभर टक्के कारवाई करण्यात यावी. नसेलतर फौजदारी दाखल करावी. देशाच्या पंतप्रधानांची अशा प्रकारे कोणी फसवणूक करत असेलतर त्याला माफी देणे योग्य नाही. अन्यथा नियमानुसार काम करायला कोणी धजावणार नाही.

----------

ठराव क्रमांक – ५५७ विषय क्रमांक – १
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/२/कावि/३५७/२०१७ दि.९/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी आवश्यक लागणा-या ३ ते ५ वर्षाच्या आतील टुरिस्ट परमिट (पिवळे नंबर प्लेट) असलेल्या ११ टाटा सुमो अथवा तत्सम वाहने (६+१) भाडेतत्वावर घेण्याबाबत निविदा क्रं.१५/२०१५-२०१६ मधील लघुत्तम निविदाधारक ओम एंटरप्रायजेस यांचे प्राप्त दर प्रतिवाहन प्रतिदिन ६० किमीसाठी र.रु.१५००/- प्रमाणे व पुढील ६० किमीसाठी ८.५० दर या प्रमाणे मान्यता घेण्यात आली आहे. भोसरी रुग्णालयाच्या अंतर्गत मोशी, च-होली करिता १ वाहन व तालेरा रुग्णालयाच्या अंतर्गत पुनावळे व किवळे दवाखान्यासाठी १ वाहन असे एकुण वाढीव २ वाहनाकरिता १६ महिन्यासाठी निविदेतील लघुत्तम दरानुसार वाढीव गाड्यांसाठी र.रु.१२,००,०००/- (अक्षरी र.रू.बारा लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** मा.तुपे,सहशहर अभियंता यांनी पुढील वेळी सभेस येताना, अधिकारी वापरत असलेल्या एकूण गाड्यांची संख्या, किती गाड्या डिझेलवर चालतात, किती गाड्या पेट्रोलवर चालतात, यापोटी किती रक्कम खर्च होते, याची विभागवार माहिती घेऊन यावी. प्रत्येक विभागाने सदर माहिती सादर करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५५८ विषय क्रमांक – २
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – लेखा
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/२४२/२०१७ दि.१८/५/२०१७
विषय - सन २०१५-१६ मधिल उर्वरित संचलनतूट रक्कम अदा करणेबाबत...

विषय क्रमांक २ चा विचार दि.१२/७/२०१७ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५५९ विषय क्रमांक – ३
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/४८/१७ दि.१९/५/२०१७
विषय– सायन्स पार्क भेटीच्या देय बीलाबाबत तसेच पिंपरी चिंचवड विज्ञान केंद्रास भेटीकामी पुरविणेत आलेल्या प्रासंगिक करारावरील बिलाबाबत...

विषय क्रमांक ३ चा विचार दि.१२/७/२०१७ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय- १)** दि.१४.६.२०१७ रोजी झालेल्या स्थायी सभेमध्ये पीएमपीएमएलच्या कामकाजाबाबत स्थायी समितीने जे प्रश्न विचारले होते, त्याची माहिती दि.२८.६.२०१७ चे सभेचे वेळी सादर करणेबाबत स्थायी समितीकडून पीएमपीएमएलच्या अधिका-यांना सूचना देण्यात आल्या होत्या. परंतू सह व्यवस्थापकीय संचालक हे आज सभेत उपस्थित राहिले नाहीत, याचा स्थायी समिती कडक शब्दांत निषेध करते.

**२)** स्थायी समितीने मांडलेल्या प्रश्नांची उत्तरे ही पीएमपीएमएलच्या सक्षम अधिका-यांकडूनच मिळणे अपेक्षित आहे. यापुढे पीएमपीएमएलने स्थायी समिती सभेस उपस्थित राहणेकरिता सक्षम अधिका-यांनाच पाठवावे. अन्य अधिका-यांनी सभेस उपस्थित राहू नये. महापालिकेच्या १२८ नगरसेवकांच्या वॉर्डमधील हा विषय आहे. नगरसदस्यांच्या भावना खूप तीव्र आहेत. नागरीकांशी संबंधित विषय आहे. संविधानाने घालून दिलेल्या नियमांनुसारच इथे कामकाज होणार आहे. त्यामुळे आज सभेस उपस्थित असलेल्या अधिका-यांनी मुख्य व्यवस्थापकीय संचालक यांना स्थायी समितीने केलेले आदेश/सूचना अवगत करुन द्याव्यात.

**३)** सह व्यवस्थापकीय संचालक यांना स्थायी समितीकडून कडक शब्दांत सूचना आहेत की, अशाप्रकारे अवहेलना करण्यात येऊ नये. स्थायी समितीचा आदेश अधिका-यांनी डावलला आहे. इथून पुढे पीएमपीएमएलने कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा करु नये.
विषय क्रमांक २ आणि ३ हे दि.१२.०७.२०१७ चे सभेपर्यंत तहकूब करणेत येत आहेत.

----------

ठराव क्रमांक – ५६०　　　　विषय क्रमांक – ४
दिनांक – २८/०६/२०१७　　　　विभाग – दक्षता व नियंत्रण कक्ष
सूचक – मा.कोमल मेवानी　　　　अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दवनि/कावि/२/८३/२०१७ दि.२२/०५/२०१७
विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगवी स्मशानभूमीत पर्यावरणपूरक गॅस शवदाहिनी बसविणेच्या कामाचा आर्थिक व तांत्रिक सल्ला अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेकडून घेणेबाबत...

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५६१　　　　विषय क्रमांक – ५
दिनांक – २८/०६/२०१७　　　　विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे　　　　अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/६१८/२०१७ दि.१५/६/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील पावसाळी गटर्स चेंबर्स खरडून साफ करणे व त्यातून निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतूक करुन मोशी कचरा डेपोत खाली करुन पसरुन देणेकामी निविदा नोटीस क्र.३/२०१७-२०१८ साठी ३ प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे अण्णासाहेब मगर स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था यांनी ८.५% कमी दराने काम करण्यास मान्यता दर्शविलेली आहे. या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या र.रू.७,१३,०००/- (अक्षरी र.रू.सात लाख तेरा हजार फक्त) पेक्षा ८.५% कमी या

दराने आलेली निविदा सर्वात कमी दरांची असल्याने स्विकारणेबाबत मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.१५/०६/२०१७ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे अण्णासाहेब मगर स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था यांचेकडून निविदा मंजूर दराने र.रू.६,५२,३९५/- पर्यंत काम करून घेणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५६२ विषय क्रमांक – ६

दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/६२०/२०१७ दि.१५/६/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नाले खरडून साफ करणे व त्यातून निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतूक करुन मोशी कचरा डेपोत खाली करुन पसरुन देणेकामी निविदा नोटीस क्र.१/२०१७-२०१८ साठी ३ प्राप्त झालेल्या निविदांपैकी श्री.संत साई स्वयंरोजगार सेवा संस्था यांनी १०% कमी दराने काम करण्यास मान्यता दर्शविलेली आहे. या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या र.रू.९,९९,६९७/- (अक्षरी र.रू. नऊ लाख नव्याण्णव हजार सहाशे सत्यान्नव फक्त) पेक्षा १०% कमी या दराने आलेली निविदा सर्वात कमी दरांची असल्याने स्विकारणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.०७/०६/२०१७ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री.संत साई स्वयंरोजगार सेवा संस्था यांचेकडून निविदा मंजूर दराने र.रू.८,९९,७२७/-(अक्षरी र.रू.आठ लाख नव्यान्नव हजार सातशे सत्तावीस फक्त) पर्यंत काम करून घेणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५६३ विषय क्रमांक – ७

दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – स्थानिक संस्था कर

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्थासंक/३/कावि/६२/२०१७ दि.१७/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

स्थानिक संस्था कर विभागासाठी मनपा कामकाजास्तव उपलब्ध करून देणेत आलेले स्थानिक संस्था कर विभागाच्या वापरातील म.न.पा. वाहन क्र MH-१४ AE- ८१६४ (टाटा सुमो) करीता 185/85 R16 LT CZAR H/TI 105 set या साईजचे पाच नग नविन टायर्स-टयुब मे.सीएट लि. उत्पादीत कंपनी गणराज एंटरप्रायजेस चिंबळी फाटा कुरूळी खेड यांचेकडून थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अगावू एकूण र.रू.२३,२६८/-(अक्षरी र.रू.तेवीस हजार दोनशे अड्डसष्ट फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५६४ विषय क्रमांक – ८
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/कावि/४६/१७ दि.१५/६/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (१ ते २) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५६५ विषय क्रमांक – ९
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/६५/१७ दि.१९/६/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३३/०९/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.२४ मध्ये जेष्ठ नागरिकांसाठी विविध सुविधा पुरविणेकामी मे.अविष्कार कन्स्ट्रक्शन नि.र.रु.१३,६८,८५६/- (अक्षरी र.रु.तेरा लाख अडुसष्ठ हजार आठशे छप्पन रुपये फक्त) पेक्षा १०.०२% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१२,९३,२८१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५६६ विषय क्रमांक – १०
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/कावि/४/११४/२०१७ दि.१७/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील एम.आर.आय. सेंटर मे.रुबी एलकेअर यांना दि.९/५/२०११ पासून ५ वर्षे कालावधीसाठी CGHS च्या (-)२७% दराने without contrast व with contrast MRI करुन देणेकामी करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत करणेत आले होते. सदर करारनाम्याची मुदत संपत आली असलेने तसेच नवीन जादा क्षमतेचे MRI मशिन निविदा प्रक्रियेद्वारे खरेदी करणेकामी लागणारा कालावधी विचारात घेता मे.रुबी एलकेअर यांना दि.०८/०२/२०१७ पासून

किमान नऊ महिने कालावधीसाठी (दि.०८.११.२०१७ पर्यंत) पूर्वीच्या करारनाम्यास अधिन राहून मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५६७ विषय क्रमांक – ११
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/५३१/२०१७ दि.२०/६/२०१७

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५६८ विषय क्रमांक – १२
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.राजू मिसाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२१५/१७ दि.२२/६/२०१७
विषय - वॉर्ड क्र.२४ (नवीन प्र.क्र.२९) इंद्रायणीनगर से.नं.१ महाराष्ट्र कॉलनी शेजारी मोकळा भुखंड क्र.३ मध्ये पोहण्याचा तलाव बांधणेबाबत...

विषय क्रमांक १२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५६९ विषय क्रमांक – १३
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/२१६/१७ दि.२२/६/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३८/८/१६-१७ प्रभाग क्र.४३ जिजामाता हॉस्पीटल येथील विविध म.न.पा. शाळा, सांस्कृतीक केंद्रे, व्यायामशाळा, दवाखाना इमारतीची रंगरंगोटी, देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकामी मे.एल.एन.एंटरप्रायजेस नि.र.रु.१४,००,१४१/- (अक्षरी र.रु.चौदा लाख एकशे एक्केचाळीस फक्त) पेक्षा ६.९०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१३,०३,५३१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरा मध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्क्म अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५७०
विषय क्रमांक – १४
दिनांक – २८/०६/२०१७
विभाग – स्थापत्य
सूचक – मा.अनुराधा गोफणे
अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/इम/कावि/२१७/१७ दि.२२/६/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२२/२६/१६-१७ प्रभाग क्र.३० चक्रपाणी वसाहत मध्ये ठिकठिकाणी खडीमुरुम पद्धतीने रस्त्यांची सुधारणा करणेकामी मे. अनंत बाळकृष्ण बहिरट नि.र.रु.१०,५०,४२०/- (अक्षरी र.रु.दहा लाख पन्नास हजार चारशे वीस फक्त) पेक्षा २७.७२% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.७,५९,२४४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राटकालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५७१
विषय क्रमांक – १५
दिनांक – २८/०६/२०१७
विभाग – स्थापत्य
सूचक – मा.लक्ष्मण उंडे
अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/२१८/१७ दि.२२/६/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३८/४४/१६-१७ प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव येथील विविध आरक्षणे विकसीत करणे व सिमाभिंत बांधणेकामी मे.पांडुरंग एंटरप्रायजेस नि.र.रु.७,००,१२०/- (अक्षरी र.रु.सात लाख एकशे वीस फक्त) पेक्षा १२.५०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.६,१२,६०५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५७२
विषय क्रमांक – १६
दिनांक – २८/०६/२०१७
विभाग – पाणीपुरवठा व जलनिःसारण
सूचक – मा.उत्तम केंदळे
अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/५/कावि/५१९/२०१७ दि.१७/०६/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जलनि:सारण विभागातील कार्यकारी अभियंता (क, इ, फ क्षेत्रीय कार्यालय) श्री भोसले यांचे कार्यालयीन वापरात असलेले वाहन क्र.MH-14/P-4412 (AMBESSEDOR ) या वाहनाचे टायर (ट्यूब सहित) मा.आयुक्त सो. यांचेकडील मान्य प्रस्ताव क्र-पापु/५/कावी/४२९/२०१६ दि

१९/१२/२०१६नुसार चार नग टायर (ट्यूब सहित) मे.एम.आर.एफ.टायर्स खडकी यांचेकडून खरेदी करणेत आलेले आहेत .त्याकरिता आगाऊ रक्कम धनादेश क्र.१०६०६९ दि.२६/१२/२०१६ रक्कम रुपये ११,६८४/- अदा करणेत आलेले आहेत. सदरील फर्मकडून दि.९/०३/२०१५ रोजी नवीन टायर वाहनाला बसवून देण्यात आले असून TAX INVOICE NO. 429392012 दि .२१/०१/२०१७ अन्वये रक्कम रुपये ११,६८७/- (अक्षरी र.रू.अकरा हजार सहाशे सत्याऐंशी फक्त) चे बिल देणेत आलेले असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५७३ विषय क्रमांक – १७
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/११/कावि/२१३/१७ दि.२२/०६/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि. पुणे यांना संगणक प्रणालींचे कामकाज देणेपुर्वी विकसित करणेत आलेल्या व त्यांची देखभाल दुरूस्ती मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि. पुणे व मे.प्रिया टेक सोल्युशन्स पुणे यांचे मार्फत सुरू असलेल्या Assets & Works Management व e-Tendering System या दोन संगणक प्रणालींचा देखभाल दुरूस्तीचा कालावधी दि. ३०/०९/२०१६ रोजी पुर्ण झालेला असल्याने १ वर्ष कालावधि करीता मनुष्यबळ उपलब्ध करणेचे कामकाज मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि. पुणे, यांना करारनामा करून देण्यास व त्याकरीता येणा-या र.रू.८,८८,३००/- (अक्षरी र.रू.आठ लाख अठ्याऐंशी हजार तीनशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५७४ विषय क्रमांक – १८
दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – प्रशासन
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/९/कावि/४४३/२०१७ दि.२२/०६/२०१७

विषय- मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३६६, दिनांक ११/०५/२०१७ नुसार श्री.पारधे स्वप्निल विजय, लिपिक यांच्या अपिल अर्जाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत...

विषय क्रमांक १८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय – १)** श्री.पारधे स्वप्निल विजय या कर्मचा-यास स्वीपर पदावर रुजू करुन घ्यावे. प्रशासनाने या विषयासंदर्भातील सर्व कायदेशीर तरतूदी तपासाव्यात.

**२)** नोकरी शिस्तीत केली पाहीजे. कोणीही चुकले तरी त्याला पाठीशी घातले जाणार नाही. परंतू कायदेशीर बाबी तपासून पुढील स्थायी समिती सभेच्या कार्यपत्रिकेवर हा विषय पुन्हा येऊ द्यावा. तोपर्यंत हा विषय तहकूब करणेत येत आहे.

----------

**यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -**

ठराव क्रमांक – ५७५ विषय क्रमांक – १९

दिनांक – २८/०६/२०१७

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.माधुरी कुलकर्णी, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४६३, विषय क्र.२८, दि.३१/०५/२०१७ मध्ये "मे.युनिक ट्रेडर्स" हा मजकूर वगळून त्याऐवजी "मे.एच.सी.लुंकड" अशी दुरुस्ती करुन मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५७६ विषय क्रमांक – २०

दिनांक – २८/०६/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा. माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे,मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.३० मधील काही स्वच्छतागृहांचे काम मागील संस्था व्यंकटेश्वरा स्वयंरोजगार संस्था यांनी बंद केलेले आहे. तरी दैनंदिन कामाची गरज, आरोग्याच्या समस्या येऊ नयेत म्हणून इतर योग्य संस्थेस काम देण्यात यावे ऐवजी मे.बी.एस.एम.एंटरप्रायजेस यांना कामकाज देण्यात मान्यता देणेत येत आहे. सदरचे कामकाज व्यंकटेश्वर स्वयंरोजगार या संस्थेने कामकाज बंद केलेल्या तारखेपासून पुर्वलक्षी प्रभावाने देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५७७ विषय क्रमांक – २१

दिनांक – २८/०६/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा. माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे,मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक १९०८३ दि.७/१२/२०१६ मध्ये "तसेच यानंतर ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत अपात्रतेचे पुर्तता करुन पात्र ठरणा-या लाभार्थ्यांना अर्थसहाय्य देणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे." या वाक्यरचनेत ३१ ऑगस्ट २०१६ ऐवजी ३१ ऑगस्ट २०१७ अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५७८ विषय क्रमांक – २२

दिनांक – २८/०६/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा. माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/३८४/२०१७ दि.२३/६/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.सन्माननीय सदस्य यांनी उपसूचनेद्वारे स्थायी समिती सभा ठराव क्र.१६८७९ दि.९/८/२०१६ नुसार मे.अमृत मुद्रणालय यांचे ०६ बाबी नुसार सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी मार्च २०१७ पर्यंत छपाई करणेस व त्याकामी एकुण र.रु.१३,००,०००/- पर्यंतच्या येणा-या जादा खर्चास व ठरावास मान्यता देणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मनपाच्या विविध विभागासाठी व मा.पदाधिकारी यांना आवश्यक निमंत्रणपत्रिका, लेटरहेड व पाकीटे छपाई साहित्य खरेदीकामी ई.नि.सु.क्र.४१/२०१४-१५ अन्वये मंजुर लघुत्तम निविदाकार मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांना विविध विभागाच्या मागणीनुसार छपाई साहित्य छपाई करुन पुरविणेकामी पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला आहे. सदर प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व छपाईकामी आलेल्या एकुण र.रु.१०,८१,३००/- (अक्षरी र.रु.दहा लाख एक्याऐंशी हजार तीनशे फक्त) च्या खर्चाची माहिती अवलोकन करणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५१/२०१७
दिनांक - ०६/०७/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.